**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk2a@dte org.in Internet :http/www.dte.org.in

का.२अ/एडीएम/धनाकर्ष/२००९/२८७४
दि. 29 SEP 2009

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई /पुणे / नाशिक /औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय : शै. वर्ष २००९-१० मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी तसेच १०वी नंतरच्या पदविका व १२ वी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमाची माहितीपुस्तके विक्री करुन जमा झालेली रक्कम या कार्यालयास तात्काळ पाठविण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, **शै. वर्ष २००९-१० मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी तसेच १० वी नंतरच्या पदविका व १२ वी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमाची** माहितीपुस्तके विक्री करण्यासाठी आपल्या विभागातील प्रवेश अर्ज स्विकृती केद्राना देण्यात आलेली आहेत. याबाबतची प्रवेश अर्ज स्विकृती केद्राची यादी सोबत जोडण्यात आलेली असून आपल्या अखत्यारीतील संबंधित केंद्राना **थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठीच्या माहितीपुस्तकांचे रु.४००/- प्रमाणे जमा झालेल्या रकमेचे अभ्यासक्रमनिहाय धनाकर्ष तयार करुन तसेच १० वीनंतरच्या पदविका व १२ वी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमासाठीचे खुल्या प्रवर्गासाठी रु.४००/- प्रमाणे जमा झालेल्या तसेच राखीव प्रवर्गासाठी रु.३००/- प्रमाणे** जमा झालेल्या रकमेचे धनाकर्ष **Director of Technical Education, Mumbai** यांच्या नांवे तयार करुन अभ्याक्रमानिहाय तपशीलासहित दि.५/१०/२००९ पर्यन्त आपल्या कार्यालयास सादर करण्याबाबत कळविण्यात यावे. या कामी सहा. संचालक (अता) यांची नियुक्ती करण्यात यावी व प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रानी आपल्याकडे जमा केलेले धनाकर्ष सहा संचालक (अता) यांनी या कार्यालयास दि.१५/१०/२००९ पर्यन्त जमा करावेत.

(डॉ. एस. के. महाजन)
प्र. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

विवि 10.5

जा क्र तंशिविकापु/ससावि/२००९/६५४८

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दिनांक : ०८/१०/२००९
8 OCT 2009

प्रत : या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व १० वी व १२ वी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्ज विक्री व अर्जस्वीकृती केंद्र प्रमुख यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी.

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रातील दिलेल्या सुचानांनुसार धनाकर्ष या कार्यालयास दिनांक १०/१०/२००९ पर्यत जमा करावे.

(डी एन शिंगाडे)
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे